**निशाणी क्र. ५२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११ नियम १ प्रमाणे दाखल केला आहे.

२. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३० याने प्रस्तुत वादी व प्रतिवादी क्र. १५ यांच्याविरुध्द प्रतिदावा दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३० याने प्रतिदाव्यासोबत दाखल केलेली छायाचित्रे वादीच्या घरासमोरील अंगणातील फरशी बसविणेचे काम व अंगणात पत्र्याचे छप्पर टाकण्याचे काम सुरु असतानाचे आहेत. वादीला ज्या दिवशी सदरहू प्रतिदाव्याची प्रथमतः माहिती मिळाली त्याच दिवशी म्हणजेच दि. २३/२/२०१६ इ. रोजी सदरची छायाचित्रे काम सुरु असतानाची असून प्रत्यक्षात घरासमोरील अंगणातील फरशी व पत्र्याचे छप्पर टाकण्याचे काम पुर्ण झाल्याबाबत हमीपत्र न्यायालयात दिले आहे. सदर दिवशी प्रतिवादी क्र. ३० ला या न्यायालयाच्या पुर्वाधिकारी यांनी कथीत कामाच्या सद्यस्थितीबद्दल विचारले असता त्याने देखील फरशी बसविण्याचे काम पुर्ण झाल्याचे मान्य केले आहे. याचाच अर्थ असा होतो की, प्रतिवादी क्र. ३० याने प्रतिदावा दाखल केला त्याच दिवशी वादीच्या अंगणातील फरशी बसविणेचे व अंगणात पत्र्याचे छप्पर टाकण्याचे काम पुर्ण झाल्याबाबतची पुर्ण कल्पना व जाणीव त्याला होती. हेतुतः प्रतिवादी क्र. ३० याने वस्तुस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३० याने सद्यवस्तुस्थिती का लपवून ठेवली याचा शोध घेतला जाणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे वस्तुस्थितीचा शोध घेण्यासाठी प्रतिवादी क्र. ३० यास या अर्जासोबत दिलेले लेखी सवाल देण्यास परवानगी मिळणेसाठी व त्याचे उत्तर प्रतिज्ञापत्राद्वारे त्याने देण्याचा आदेश होणेविषयी प्रस्तुत वादीने विनंती केली आहे.

**३.** प्रतिवादी क्र. ३० याने निशाण क्र. ६० ला सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने

कोणतीही बाब न्यायालयापासून लपवून ठेवलेली नाही. वादी हा बांधकाम करत होता म्हणून त्याने निशाण क्र. ५० ला सदरचे बांधकाम करणार नाही असे हमीपत्र दिले आहे. यावरुन वादीची लबाडी दिसून येते. सदच्या बांधकामास त्याने ग्रामपंचायत सदरी हरकत घेतली होती. ग्रामपंचायतीने कोणतीही दखल न घेतलेने प्रतिवादीस वादीविरुध्द प्रतिदावा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल करणे भाग झाले होते. त्याने दिनांक २२/३/२०१६ इ. रोजी प्रतिदावा दाखल केला आहे व वादीने दिनांक २३/३/२०१६ इ. रोजी हमीपत्र दिले आहे. प्रतिवादीने जी छायाचित्रे हजर केली आहेत ती दिनांक १५/३/२०१६ इ. रोजीची आहेत. सदरचे बांधकाम दिनांक २३/३/२०१६ पर्यंत चालू होते म्हणून त्याने तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे. त्याने कधीही मे. न्यायालयासमोर बांधकामाबाबत कबूली दिली नव्हती. तसेच सदरचे बांधकाम वादीचे घराचाच एक भाग आहे, त्यामुळे स्वतःची लबाडी लपवून ठेवणेकरीता सदरचा खोटा व खोडसाळ अर्ज वादीने दाखल केला आहे. सबब, तो फेटाळण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

**४.** वादी व प्रतिवादी क्र. ३० तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्जामधील कथने व उपलब्ध अभिलेखावरुन वादी याने केलेले बांधकाम दिनांक २२/३/२०१६ इ. रोजी सुरु होते की वादी म्हणतो त्याप्रमाणे सदरचे बांधकाम त्या पुर्वीच पुर्ण झाले आहे याबाबतचे प्रतिवादी क्र. ३० ने केलेले कथन खरे आहे की, खोटे आहे हे पाहण्यासाठी वादी याने सदरचा अर्ज दाखल केला आहे असे दिसून येते. वादी याने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सामाईक मिळकतीमध्ये घराचे अगर विहिरीचे कोणतेही बांधकाम करु नये खोदकाम करु नये म्हणून निरंतर मनाईची दाद मागितली आहे. प्रतिवादी क्र. ३० याने वादी व प्रतिवादी क्र. १५ याने दावा मिळकतीमध्ये अनाधिकृत बांधकाम करु नये यासाठी निरंतर मनाईची व असे बांधकाम

केल्यास ते पाडून मिळण्यासाठी करणात्मक व्यादेशासाठी प्रतिदावा दाखल केल्याचे दिसून येते. यावरुन वादी व प्रतिवादी क्र. ३० यांच्यामध्ये वादी याने दावा मिळकतीमध्ये त्याचे घराचे बांधकाम कधी पूर्ण केले आहे ? हा वाद विषय नसून वादी हा अनाधिकृतरित्या बांधकाम करत आहे का ? अगर त्याने केलेले बांधकाम हे बेकायदेशीर आहे का ? हा वाद विषय आहे. त्यामुळे वादी याने केलेले बांधकाम पूर्वीच पुर्ण झाले होते अगर प्रतिवादी क्र. ३० याने प्रतिदावा दाखल केला तेव्हा ते बांधकाम सुरु होते याबाबतचे निवारण करणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे त्या संदर्भात प्रश्नावली सादर करुन त्याबाबतची उत्तरे घेण्याची आवश्यकता मला वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

— **आदेश** —

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : १७/०२/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.